# अफवा आणि गैरसमज

मनुष्य पूर्वीपासून पशु आणि पक्षांची शिकार करीत आला आहे. पशु आणि पक्षी तर मनुष्याची शिकार करू शकत नाही. हो, जर कोणी व्यक्ती वाघाच्या समोर आला तर वाघ मनुष्याची शिकार करतो परंतु हे तर कधी कधीआणि कोणा-कोणाच्या बरोबर घडणारी घटना आहे. अशी घटना निशस्त्र आणि असावधान व्यक्तीबरोबर जंगलात घडू शकते कारण की वाघ तर जंगली प्राणी आहे. शहरात सुद्धा बुद्धिजीवी, पंडित, विद्धान व तर्कशील व्यक्ती सुद्धा सहजपणे दुसऱ्या मनुष्यांची शिकार बनतात कारण की ते विवेकरूपी कवच त्या वेळेस घालून बसत नाहीत. तसेच आत्मरक्षणासाठी जी परख-बुद्धी पाहिजे ती ही त्या वेळेस नसते. मनुष्याची शिकार करणारा तो नरभक्षी राक्षस आहे - अफवा, भैकावणे किंवा गैरसमज. म्हणून लोक सहज बोलचालीतून म्हणतात - ''मी अफवेचा शिकार झालो होतो.'' किंवा गैरसमजूतीचा शिकार झालो होतो.

या शिकारीसाठी काही बंदुकीची, वाघाची गरज नाही. यासाठी तर मुखातून काही असे शब्द निघायला पाहिजे की ज्यांच्यावर कोणी विश्वास करील. असे किती तरी लोक आहेत जे प्रत्येक येणाऱ्या दिवशी अफवा, गैरसमजुतीचा शिकारी होत राहतात. अशा लोकांबद्दल म्हटले जाते की ते ''कानाचे कच्चे'' आहेत. आवश्यकतेपेक्षा जास्त बुद्ध आहेत. ते आपल्या विवेकाचा प्रयोग करीत नाहीत. जसे कोणी असावधान व्यक्ति घराचा दरवाजा नेहमी उघडा ठेवतो व अनोळख्या व्यक्तीने प्रवेश केल्यावर सुद्धा विचारपूस करीत नाही तेव्हा चोर त्याला लुटून नेतो. तसेच हे लोक सुद्धा आपला अंध विश्वासाचा दरवाजा नेहमी उघडा ठेवतात आणि अज्ञात कुळाच्या व्यक्तीला येऊ देतात व आपल्या विवेकाचा पाहारा देण्यापासून रोकतात. ते सुद्धा कितीतरी गैरसमजुतींचे शिकारी होत राहतात. अरेरे! त्यांना विवेकाच्या कमकुवतपणाने खाल्ले. अफवा तर प्लेगपेक्षा जास्त लवकर पसरतात. अफवा जंगलाच्या आगीहून तीव्र गतीने पसरतात. दुर्भाग्याची गोष्ट म्हणजे लोक या अफवा, पसरवण्यास सहयोग देतात. कितीतरी भांडणे या गैरसमजुतीतून होतात व कितीतरी लोक यात अडकून पैसा, जीवन अथवा आपल्या वर्चस्वाला गमावून बसतात.

काही लोक लहान मुलांना गंमतीने अचानक चेहरा बनवित म्हणतात - अरे बघ, कावळा तुझे कान, घेऊन गेला. लहान मुलाला हे समजत नाही व तो जवळची काठी घेऊन कावळ्याला मारण्यासाठी पळतो व म्हणतो - 'दे माझे कान नाहीतर काठीच मारीन. देतोस की नाही ? तेव्हा सर्वजण हसतात व त्याला जवळ बोलावून प्रेमाने म्हणतात - बघ तू आपला हात लावून, तुझे कान तर त्याच जागेवर आहेत, तू बुद्धू आहेस ! बुद्धू ! तेव्हा मुलगा चिडतो व म्हणतो की - तुम्ही मला धोका देतात आणि मग बुद्धू म्हणतात.

अशा प्रकारे जगात बुद्धू बनविणारे खूप आहेत. काही लोक शारीरिक वयाच्या दृष्टीने मोठे असतात, परंतु ते असतात बालक - बुद्धि. ते आपले कान सांभाळत नाहीत, धोका खातात व मग म्हणतात की 'आम्ही गैरसमजुतीचे शिकारी झालो होतो.''

अफवांची तर गोष्टच विचारू नका. त्या तर झटक्यात दूर दूरपर्यंत जना-जना पर्यंत पोहोचतात. मनुष्यांना एक चटक आहे - अफवा ऐकून मजा घेण्याचा. जसा कोणाला पान मसाल्याचा, अन्य कोणाला तंबाखूचा, तिसऱ्या कोणाला आणखी कशाची चटक असते, काही लोकांना याची चटक लागून राहते. अफवा त्यांच्या मनाला खुश करण्याचे साधन असतात. म्हण आहे ना - 'काम नहीं धंदा, मनुष्य होता फिरता गंदा.' आणखी काही काम नसेल तर दिल्लगी करण्यासाठी अफवा पसरविणे सहज असते. यासाठी ना क्रिकेटचे मैदान पाहिजे ना नेट पाहिजे, ना वॉलीबॉल, ना कॅरम पाहिजे. चार व्यक्तींची टोळी पुरेशी आहे. ना पंच पाहिजे ना कॅप्टन, ना अन्य साधन हवे. बस, मोकळे बसून काय करणार ? या, गप्पा मारू, एक-दुसऱ्याबद्दल अफवा पसरवू, अफवांचे फुगे उडवू.

मनुष्य समजतो की हे स्वातंत्र्य आहे परंतु वास्तविक ही वेळेची बरबादी आहे. हे मन-बुद्धिचे प्रदूषण आहे. असे

करणारेच रामायणातील दूषण आहेत. ना कोणत्या गोष्टीशी काही संबंध, ना घेणे, ना काही जिम्मेदारी, ना काही मतलब. व्यर्थ साबणाच्या फेसात फुक मारून फुगे बनवून उडवायचे आणि बघत राहायचे.

चांगले-चांगले लोक या गोष्टीचे 'शिकारी' होतात आणि अशा प्रकारे कोणाच्या पाठीमागे कोणाची निंदा करतात. त्यांना मागचे-पुढचे काहीच ठाऊक नसते. शेख चिल्लीप्रमाणे गोष्टी करतात. ते म्हणतात - 'अरे तू ऐकलेस, त्या अमक्याने हे काम केले? गप्पा ठोकणाराचा मित्र महा गप्पिष्ट म्हणतो - 'अरे, हे त्याने केले आहे ! अरे, आम्ही तर समजत नव्हतो कि तो असा व्यक्ति आहे! बघा, लोक बाहेरून काय असतात आणि वास्तविक मध्ये काय !' त्यांच्याबरोबर असलेला गप्पिष्टांचा महंत म्हणतो - अरे भाऊ, त्यांच्यापेक्षा तर तुम्ही आणि आम्ही बरे. बोला आहे क नाही ? गप्पिष्ट आणि महागप्पिष्ट दोघे म्हणतात - ''अरे गात काय शंका आहे, आम्ही तर यांच्याहून चांगलेच आहोत.'' मग सर्व गप्पा ठोकणारांचा महामंडलेश्वर श्री श्री १०८ स्वामी म्हणतो....अरे आपल्याला तर काहीच माहीत नाही. अरे, याने तर आमक्या वेळेस हे केले होते आणि दुसऱ्या क्षणाला तमके काम केले होते. मी तुम्हाला याचे सगळे रामायण सांगितले आणि महाभारताची कथा ऐकविली, मग तुमचे डोळे उघडतील. तर अशाप्रकारे असे डोळे उघडणारे लोक आपल्याला खूप मिळतील. जे स्वार्थी आहेत, खोटे आहेत आणि ज्यांचा हाच धंदा आहे. समजदार व्यक्तीचे कर्तव्य आहे की त्याने त्या व्यक्तीशी बोलावे आणि विचारावे ज्याबद्दल लोक व्यर्थ घोटाळा करीत आहेत. त्याने या निंदकाला समोर करावे कि बघा हा असे म्हणतो परंतु तो सहजच अंधविश्वासाचा शिकारी होऊन जातो. हे योग मार्गातून घसरणे आहे, यात सांभाळून चालावे. ठक विद्या येणाऱ्या लोकांचा तर हा मंत्रच आहे - 'दुनिया ठगिये धोखे से, रोटी खाईये शक्कर से' म्हणून जागोजागी लिहिलेले असते धोकेबाजांपासून सावध रहा. अफवा व गैरसमज पसरविणारे लोक मित्र नसतात. ते कोणाचेच मित्र नसतात. उदया ते कोणाबद्दल ही अफवा पसरवू शकतात आणि लोकांना भैकावू शकतात. म्हणून वाईट ऐकू नका, वाईट बोलू नका, वाईट लोकांचा संग करू नका नाहीतर वाईटाचे शिकारी व्हाल.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**